

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
सोलापूर : बुधवार, ७ ऑगस्ट २०२४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारताचे सामने

**ॲथ्लेटिक्स** : सकाळी ११.०० वा.- मॅराथॉन शर्यत वॉक मिश्र रिले (सूरज पनवार, प्रियंका गोस्वामी,

दुपारी १:३५ नंतर- पुरुष उंच उडी पात्रता (सर्वेश कुशारे), दुपारी १:४५ नंतर- महिला १०० मीटर अडथळ्याची शर्यत पहिली फेरी (ज्योती याराजी), दुपारी १:५५ नंतर- महिला भालाफेक पात्रता (अन्नू राणी), रात्री १०:४५ नंतर- पुरुषांची तिहेरी उडी पात्रता (प्रवीण चित्रवेल, अब्दुल्ला अबोबकर), रात्री १२:१५ पासून- महिलांची ४०० मीटर उपांत्य फेरी (पात्रतेच्या अधीन), रात्री १.१० वा.- पुरुषांची ३००० मीटर स्टीपलचेस अंतिम (पात्रतेच्या अधीन) अविनाश साबळे **गोल्फ** : दुपारी १२.३० वा.- महिला पहिली फेरी (अदिती अशोक, दीक्षा डागर) **टेबल टेनिस** : दुपारी १:३० नंतर- पुरुष महिला सांघिक उपांत्यपूर्व फेरी (पात्रतेच्या अधीन) **कुस्ती** : दुपारी २.३० वा.- महिला ५० किलो रिपेचेज (पात्रतेच्या अधीन). दुपारी ३ वा.- महिलांची ५३ किलो अंतिम १६ फेरी (अंतिम पांघळ), दुपारी ४.२० वा. नंतर- महिला ५३ किलो उपांत्यपूर्व फेरी (पात्रतेच्या अधीन). रात्री १०.२५ नंतर- महिला ५३ किलो उपांत्य फेरी (पात्रतेच्या अधीन). **भारोत्तोलन** : रात्री ११ वा- महिला ४९ किलो वजन गट (मीराबाई चानू) **टेबल टेनिस** : रात्री ११:३० नंतर- पुरुष सांघिक उपांत्य फेरी (पात्रतेच्या अधीन). **कुस्ती** : रात्री १२.२० वा.- महिलांची ५० किलो पदक स्पर्धा (पात्रतेच्या अधीन) **मुष्टियुद्ध** : पहाटे १.०० वा.- महिला ५७ किलो उपांत्य फेरी (पात्रतेच्या अधीन)

### डोपिंग चाचणीत ग्रीसचा ॲथ्लिट दोषी

**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेतील ग्रीसचा एक ॲथ्लिट दोषी आढळला असून त्याला खेळाडूंचे निवासस्थान असलेले क्रीडाग्राम सोडण्यास सांगितले आहे, असे पॅरिस ऑलिम्पिक समितीने एका निवेदनात म्हटले आहे. ग्रीसच्या या खेळाडूच्या नमुन्यात प्रतिबंधित पदार्थाचे अंश आढळून आले. ग्रीसच्या डोपिंगविरोधी एजन्सीने सकारात्मक निकालाची माहिती दिली असून या खेळाडूवर आपोआप तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे, असे ऑलिम्पिक समितीने सांगितले.या खेळाडूची ओळख पटवली नाही किंवा तो कोणत्या खेळात भाग घेत आहे, याची कल्पना नाही, असेही ऑलिम्पिक समितीने म्हटले आहे.

### किरण पहल बाहेर

**पॅरिस** : भारतीय धावपटू किरण पहल हिने महिलांच्या ४०० मीटर रिपेचेझ हीट ५ मध्ये सातवे स्थान मिळविले व स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर झाली. चार रिपेचेज हीटपैकी प्रत्येकी हीटमध्ये अव्वल धावपटू उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतात.

### पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ४० हून अधिक खेळाडूंना कोरोनाची लागण

**पॅरिस** : पॅरिस ऑलिम्पिकमधील ४० हून अधिक खेळाडूंना कोरोनाची लागण झाली असून लसीकरण कमी झाल्यामुळे ऑलिम्पिकमध्ये कोरोनाच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) मंगळवारी म्हटले आहे. कोरोना या साथीच्या आजारामागील विषाणू अजूनही आहेत. त्यामुळे कोरोनाच्या प्रसारावर आळा घालण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अनेक मानांकित ॲथ्लिट्सना कोरोनाची लागण झाली आहे, असे डब्ल्यूएचओने म्हटले आहे. ब्रिटीश जलतरणपटू ॲडम पीटीने १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये रौप्यपदक जिंकल्यानंतर त्याला बरे वाटत नव्हते म्हणून कोरोना चाचणी केली असता त्याला कोरोना झाल्याचे निदर्शनास आले. ऑस्ट्रेलियन पदकाची आशा लानी पॅलिस्टरने आजारी पडल्यानंतर महिलांच्या १५०० मीटर फ्रीस्टाइलमधून माघार घेतली. कोरोना अजूनही आपल्यामध्ये खूप आहे. हा विषाणू सर्व देशांमध्ये पसरत आहे. कोरोना या साथीच्याआजारावर प्रतिबंध घालण्याची तसेच त्याचा सामना करण्यासाठी तयारी करण्याची गरज असल्याचे डब्ल्यूएचओच्या मारिया व्हॅन केरखोव्ह यांनी सांगितले.

# पहिल्याच प्रयत्नात नीरज अंतिम फेरीसाठी पात्र

**हंगामातील सर्वोत्तम ८९.३४ मीटरची कामगिरी**

**किशोर जेना नवव्या स्थानासह बाहेर**

**अंतिम फेरी गुरुवारी रात्री ११.५५ वाजता**



◆ **पॅरिस, ६ ऑगस्ट**

गतविजेता नीरज चोप्राने मंगळवारी येथे पात्रता फेरीत पहिल्याच प्रयत्नात ८९.३४ मीटरच्या हंगामातील सर्वोत्तम कामगिरीसह पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेच्या पुरुष भालाफेकच्या अंतिम फेरीत धडक मारली.

टोकियो ऑलिम्पिकमधील आपल्या कामगिरीप्रमाणेच २६ वर्षीय नीरजने आपल्या पहिल्याच प्रयत्नांत ८४ स्वयंचलित पात्रता गुण ओलांडून गट ब मध्ये अव्वल स्थान पटकावले. ही त्याची कारकिर्दीतील दुसरी सर्वोत्तम कामगिरी ठरली. २०२२ मध्ये त्याची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ८९.९४ मीटर आहे. आपल्या दुखापतीची तमा न बाळगता नीरजने जबरदस्त कामगिरी केली. निरज ॲडक्टर निगलशी झुंज देत आहे.

पुरुषांच्या भालाफेकमधील अन्य भारतीय ॲथ्लिट किशोर जेनाने ८०.७३ मीटरपर्यंत फेक केली. त्याने गटात नववे स्थान मिळविले व १२ जणांच्या अंतिम फेरीत स्थान मिळविण्याच्या शर्यतीतून बाहेर झाला. विद्यमान राष्ट्रकुल विजेता असलेल्या पाकिस्तानच्या अर्शद नदीमनेही ब गटात ८६.५९ मीटर फेक करून अंतिम फेरीसाठी पात्रता मिळविली.

याच गटातून ग्रेनेडाचा अनुभवी ॲण्डरसन पीटर्सनेही ८८.६३ मीटरची नोंद करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

चोप्राने दिवसभरातील सर्वात लक्षवेधी खेळी केवळ काही मिनिटांतच पूर्ण केली. तो अगदी अक्षरशः आला, त्याने भाला फेकला व प्रेक्षकांची मने जिंकली, अशी काहीशी गोष्ट आहे.

८४ मीटर किंवा त्याहून अधिक फेक करणारे किंवा अ आणि ब गटातील किमान १२ सर्वोत्तम कामगिरी करणारे खेळाडू गुरुवारी होणाऱ्या अंतिम फेरीत जातील.

जेनाचा सुरुवातीचा थ्रो ८०.७३ मीटर होता आणि त्याने शेवटच्या प्रयत्नात ८०.२१ मीटर टाकण्यापूर्वी दुसऱ्या प्रयत्नात फाऊल केला.

जर्मनीचा ज्युलियन वेबर ८७.७६ मीटरच्या पहिल्या फेरीत थ्रोसह अ गटात अव्वल, तर केनियाचा माजी विश्वविजेता ज्युलियस (८५.९७ मी.) व टोकियो ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता चेकियाचा जेकब वडलेज (८५.६३ मी.) अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहे.

फिनलंडचा टोनी केरानेन (८५.२७ मी) ८४ मीटरचे स्वयंचलित पात्रता चिन्ह पार करणारा चौथा ॲथ्लिट आहे.

जेनाने गत वर्षी ऑक्टोबरमध्ये आशियाड क्रीडा स्पर्धेत रौप्यपदकासाठी ८७.५४ मीटरची फेक करत स्वयंचलित ऑलिम्पिकमध्ये आपले स्थान निश्चित केले होते. त्यानंतर, त्याने मंगळवारपूर्वी सहा पैकी केवळ एका स्पर्धेत ८० मीटरचा टप्पा पार केला.

टोकिल ऑलिम्पिकचा सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा आपल्या ऑलिम्पिक भालाफेक विजेतेपद कायम राखण्याच्या उंबरठ्यावर आहे तो सलग दोन ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्याचा इतिहास रचू शकतो. ◂(वृत्तसंस्था)

# विनेश फोगट अंतिम फेरीत



**पॅरिस, ६ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिक मध्ये भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगटने ५० किलो वजनी गटात अंतिम फेरी गाठली आहे. ऑलिम्पिकच्या इतिहासात प्रथमच भारतीय महिला कुस्तीपटू अंतिम फेरीत पोहोचली आहे. आता ते उद्या म्हणजेच बुधवारी रात्री १० नंतर गोल्डसाठी डाव लावणार आहे.

उपांत्य फेरीत विनेश फोगटने क्युबाच्या कुस्तीपटू गुझमन लोपेझचा ५-0 असा पराभव केला. तिच्या श्रेणीतील पहिल्या सामन्यात तिचा सामना ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती आणि जागतिक विजेता जपानच्या युई सुसाकीशी झाला. विनेशने सुसाकीचा ३-२ असा पराभव केला. प्री-क्वार्टर फायनलमध्ये विनेशने जपानच्या ऑलिम्पिक आणि विश्वविजेत्या युई सुसाकीचा ३-२ असा पराभव केला. सुसाकी ही चार वेळा विश्वविजेती आहे आणि टोकियो ऑलिम्पिकची सुवर्णपदक विजेती सुसाकीने तिचे सर्व ८२ आंतरराष्ट्रीय साम ने जिंकले आहेत. पण, विनेशने स्वतःच्या युक्तीने सुसाकीचा पराभव केला.

सुसाकी कुस्तीमधील टेक-डाउन मॅन्युव्हर्समध्ये तज्ञ आहे. सुसाकीनेही विनेशविरुद्ध त्याचाच वापर केला. पण त्यांची चाल उलटली कारण विनेशनेही तीच युक्ती वापरून आघाडी घेतली आणि विजय मिळवला.

# भारतीय पुरुष टेबल टेनिस संघ स्पर्धेतून बाहेर



पुरुष दुहेरीच्या सामन्यात खेळताना हरमीत देसाई व मानव ठक्कर

◆ **पॅरिस, ६ ऑगस्ट**

अनुभवी अचंता शरथ कमलने प्रतिकार केला, परंतु उप-उपांत्यपूर्व फेरीत भारताला बलाढ्य चीनकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला, त्यामुळे मंगळवारी पॅरिस ऑलिम्पिकमधील पुरुष टेबल टेनिस सांघिक स्पर्धेतही भारताची मोहीम संपुष्टात आली.

हरमीत देसाई व मानव ठक्कर या भारतीय जोडीला पहिल्या दुहेरीच्या सामन्यात मा लाँग व चुकिन वांग या चीनच्या जोडीकडून २-११, ३-११, ७-११ असा पराभव पत्करावा लागला. पहिल्या एकेरीत ऑलिम्पिक विजेता फॅन झेंडॉन्गविरुद्ध खेळताना शरथने उत्कृष्ट प्रदर्शनासह पहिला गेम ११-९ असा जिंकला, पण त्यानंतर फॅनने कडवी झुंज देत कमलचा ११-७, ११-७, ११-५ असा पराभव केला. या पराभवाबरोबर भारतीय पुरुष संघ ०-२ असा पिछाडीवर पडला.त्यानंतर २४ वर्षीय मानव दुसऱ्या एकेरीच्या सामन्यात खेळला, पण चुकिनविरुद्ध त्याला ९-११, ६-११, ९-११ असा पराभव पत्करावा लागला.

सोमवारी, मनिका बत्रा, श्रीजा अकुला व अर्चना कामतचा समावेश असलेल्या भारतीय महिला संघाने उपांत्यपूर्व फेरीत रोमानियावर ३-२ अशी मात केली. ◂(वृत्तसंस्था)

## हॉकी : स्पेनला नमवून नेदरलॅण्ड अंतिम फेरीत

◆ **पॅरिस, ६ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पुरुषांच्या हॉकी स्पर्धेत मंगळवारी खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात नेदरलॅण्डने स्पेनचा सरळ ४-० ने पराभव केला आणि स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. नेदरलॅण्डने २०१२ नंतर प्रथमच ऑलिम्पिकची अंतिम फेरी गाठली असून ते तिसरे सुवर्णपदक जिंकण्याचा प्रयत्न करतील. आता नेदरलॅण्डला भारत व जर्मनीदरम्यानच्या दुसऱ्या सामन्यातील विजयी संघाविरुद्ध झुंज द्यावी लागणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# केवळ सेनला लक्ष्य करणे योग्य नाही : अश्विनी पोनप्पा

◆ **पॅरिस, ६ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदकासाठी झालेल्या लढतीत मलेशियाच्या ली झी जियाकडून भारताचा लक्ष्य सेनचा दुर्दैवी पराभव झाला. या पराभवानंतर भारताचे दिग्गज प्रकाश पदुकोन यांनी केलेल्या वक्तव्यानंतर बॅडमिंटन समुदायात फूट पडली आहे.

दमदार सुरुवात करूनही लक्ष्य सेन हरला, त्यामुळे खेळाडूंची जबाबदारी व दबाव व्यवस्थापनाबद्दल विविध प्रतिक्रिया उमटल्या. बॅडमिंटनमधील आदरणीय व्यक्ती असलेल्या पदुकोन यांनी सेनच्या पराभवाबद्दल निराशा व्यक्त केली. खेळाडूंनी दबावाला तोंड देण्याची व जबाबदारी स्वीकारण्याची गरज आहे, असे पदुकोन म्हणाले.

पदुकोन यांच्या या टीकेवर दुहेरी खेळाडू अश्विनी पोनप्पाने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.





पोनप्पा अलीकडेच जोडीदार तनिषा क्रास्टोसह महिला दुहेरी स्पर्धेतून बाहेर पडली होती.

पराभवाबद्दल एकट्या लक्ष्य सेनला लक्ष्य करणे योग्य नाही. हे बघून मला वाईट वाटले. जर एखादा खेळाडू जिंकला तर प्रत्येकजण श्रेय घेण्यासाठी पुढे येतो, मग हरला, तर केवळ खेळाडूचाच दोष आहे का? असा प्रश्न पोनप्पाने इंस्टाग्राममधील पोस्टमधून केला आहे.

तयारीचा अभाव व खेळाडू तयार होण्यासाठी प्रशिक्षकांना जबाबदार का धरले जात नाही? तेच विजयाचे श्रेय घेण्यासाठी सर्वप्रथम पुढे येतात, मग त्यांच्या खेळाडूंच्या पराभवाची जबाबदारीही का घेत नाही? असा प्रश्न तिने केला आहे.

जिंकण्यासाठी सांघिक मेहनत घ्यावी लागते आणि हरणे ही सुद्धा संघाची जबाबदारी असते. तुम्ही खेळाडूला अचानक ढकलून सर्व दोष खेळाडूला देऊ शकत नाही, असेही ती म्हणाली. ◂(वृत्तसंस्था)

## ५ हजार मी. शर्यतीतून जोशुआ चेप्तेगीची माघार

**पॅरिस** : नुकताच मुकुट घातलेला ऑलिम्पिक १०,००० मीटर शर्यतीचा विजेता जोशुआ चेप्टेगी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आपल्या ५,००० मीटरच्या विजेतेपदाचे रक्षण करणार नाही. खुद्द जोशुआने मंगळवारी इंस्टाग्रामवर जाहीर केले. १०,००० मीटरमध्ये ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकल्याचा मला अभिमान आहे. युगांडासाठी खूप आहे, असे टोकियो ऑलिम्पिकमध्ये या स्पर्धेत रौप्यपदक जिंकणारा चेप्तेगी म्हणाला. चेप्तेगीने जागतिक ज्युनियर १०,००० मीटर विजेतेपदानंतर, तीन वेळा जागतिक १०,००० मीटर विजेतेपद, १०,००० मीटरचा जागतिक विक्रम, विक्रमी वेळेत ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकले. मी माझ्या संघाशी चर्चा केल्यानंतर ५,००० मीटरमध्ये स्पर्धा न करण्याचा निर्णय घेतला आहे, असे तो म्हणाला. ५,००० मीटरसाठी हीट बुधवारी आहे, तर अंतिम सामना शनिवारी आहे.

## प्रो-कबड्डी लीग लिलावात सेहरावत, नरवालवर बोली लागणार

◆ **मुंबई, ६ ऑगस्ट**

आगामी ११ व्या प्रो-कबड्डी लीग हंगामासाठी विविध फ्रॅन्चायझींनी ८८ खेळाडूंना कायम ठेवले आहे, परंतु आगामी १५ व १६ ऑगस्ट रोजी होणाऱ्या प्रो-कबड्डी लीग लिलवात आशियाड क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता पवन सेहरावत व प्रदीप नरवाल उतरावे लागणार आहे. फ्रॅन्चायझी त्यांच्यावर बोली लावतील.

फ्रँचायझींनी उत्तम खेळाडूंचा कोर गट कायम ठेवला आहे आणि १५ आणि १६ ऑगस्ट रोजी येथे होणाऱ्या लिलावात ते मजबूत संघ तयार करण्याचा विचार करत आहे.

राखून ठेवलेल्यांमध्ये दबंग दिल्ली केसीच्या आशु मलिक आणि नवीन कुमार या रेडर जोडीचा समावेश आहे.

पुणेरी पलटणने सीझन १० मधील सर्वात मौल्यवान खेळाडू पुरस्कार विजेते अस्लम इनामदारला राखले आहे, तर जयपूर पिंक पँथर्सने त्यांचा स्टार रेडर देशवाल याला कायम ठेवले आहे.

एलिट रिटेन्ड प्लेयर्स (ईआरपी) श्रेणीतील २२, रिटेन्ड यंग प्लेयर्स (आरवायपी) श्रेणीतील २६ व विद्यमान नवीन तरुण खेळाडू (ईएनवायपी) मधील ४० असे एकूण ८८ खेळाडूंना तीन श्रेणींमध्ये कायम ठेवण्यात आले.

कायम न ठेवलेल्या खेळाडूंमध्ये मनिंदर सिंग, फाझेल अत्राचली आणि मोहम्मदरेझा शादलौई चियानेह यांचा समावेश आहे.

लिलावासाठी, देशांतर्गत परदेशी खेळाडूंना चार श्रेणींमध्ये विभागले जाईल: अ, इ, उ आणि ई. खेळाडूंना प्रत्येक श्रेणीमध्ये 'ऑल-राउंडर', 'डिफेंडर्स' आणि 'रेडर्स' म्हणून पुढील उप-विभाजित केले जाईल.

प्रत्येक श्रेणीसाठी आधारभूत किमती आहेत: श्रेणी अ - रु. ३० लाख, श्रेणी ब- रु. २० लाख, श्रेणी क- रु १३ लाख, श्रेणी ड- ९ लाख.

खेळाडू पूलमध्ये ५००+ खेळाडू असतील. प्रत्येक फ्रॅन्चायझीला त्यांच्या संघासाठी एकूण खर्चाची मर्यादा ५ कोटी रुपये आहे ◂(वृत्तसंस्था)

# भारत मालिका पराभव टाळण्यासाठी प्रयत्नशील

◆ **कोलंबो, ६ ऑगस्ट**

येथील आर. प्रेमदासा आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर भारत आणि श्रीलंका यांच्यादरम्यान वन-डे मालिकेतील तिसरा व अंतिम सामना खेळला जाणार आहे. भारतीय संघ २७ वर्षानंतर श्रीलंकेविरुद्ध मालिका पराभव टाळण्याचा कसोशीने प्रयत्न करणार आहे. मात्र त्याकरिता भारतीय संघाला फिरकी आव्हानाचा कुशलतेने सामना करण्याची जबाबदारी भारतीय फलंदाजांवर असेल.

कर्णधार रोहित शर्मा व संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून पहिल्या वन-डे मालिकेत मालिका पराभव टाळण्यासाठी कोणती व्यूहरचना आखतात, हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे. १९९७ मध्ये श्रीलंकेविरुद्ध भारताचा द्विपक्षीय एकदिवसीय मालिका पराभव झाला होता. अर्जुन रणतुंगाच्या नेतृत्वाखालील श्रीलंकेने सचिन तेंडुलकर व त्याच्या चमूवर ३-० ने मात केली होती. तेव्हापासून भारत व श्रीलंका यांच्यात ११ एकदिवसीय सामने खेळले गेले व या सर्वच सामन्यात भारताने बाजी मारली आहे.



सराव करताना के.एल. राहुल

भारत-श्रीलंकेदरम्यानच्या वन-डे मालिकेतील पहिला सामना नाट्यमयरीत्या 'टाय' झाला. दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेने भारतावर ३२ धावांनी विजय नोंदविला. याबरोबरच श्रीलंकेने मालिकेत १-० अशी आघाडी मिळविली आहे. भारत सध्याची तीन सामन्यांची मालिका जिंकू शकणार नाही, परंतु बरोबरी साधू शकतो व मालिका पराभव टाळण्यासाठी त्यांना चिवट झुंज द्यावी लागणार आहे.

**भारत-श्रीलंका तिसरा वन-डे सामना**

**स्थळ** : आर. प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो
**वेळ** : दुपारी २.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : सोनी स्पोर्ट्सवर

आर. प्रेमदासा स्टेडियमची खेळपट्टी फिरकीपटूंना चांगली साथ देत आहे, त्यामुळे भारतीय फलंदाज काहीसे अस्वस्थ झालेले दिसत आहे. स्टार फलंदाज कोहलीने तेवढ्या दोन सामन्यांमध्ये ३८ धावा केल्या आहेत, परंतु त्याच्या बाद होण्याच्या पद्धतीमुळे अधिक चिंता निर्माण झाली. रोहितने धडाकेबाज सुरुवात केल्यानंतर कोहलीला धावांची उभारणी करायची आहे.

शिवम दुबेला श्रीलंकन फिरकीपटूंचा धैर्याने सामना करत संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. श्रेयस अय्यर व केएल राहुललासुद्धा फिरकीपटूंवर प्रभुत्व मिळवावे लागणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# महिलांच्या ५ हजार मीटर शर्यतीत चेबेटला सुवर्ण, हसनला कांस्य




◆ **सेंट-डेनिस, ६ ऑगस्ट**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ५ हजार मीटर शर्यतीत केनियाच्या बीट्रिस चेबेटने सुवर्णपदक पटकावले. तिहेरी सुवर्णपदक जिंकण्यास उत्सुक असलेल्या नेदरलॅण्डच्या सिफन हसनला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

इथिओपियामध्ये जन्मलेली नेदरलॅण्डची धावपटू सिफन हसन हिने १०,००० आणि मॅराथॉनमध्येही भाग घेतला होता. तिने ५,००० मीटर शर्यतीत कांस्यपदकासह सुरुवात केली.

यावर्षी माझ्यात बरेच चढ-उतार आले. मला सावरायला दोन महिने लागले. मी येथे पदक जिंकण्यासाठी आली आहे.तीनही स्पर्धा पूर्ण करणे हे माझे मुख्य ध्येय आहे, असे हसन म्हणाली. चेबेटने शेवटच्या दोन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत रौप्य व कांस्यपदक जिंकल्यानंतर ऑलिम्पिकचे सुवर्णपदक जिंकताना १४ मिनिटे, २८.५६ सेकंद अशी वेळ नोंदवली.

इथिओपियाची गुडाफ त्सेगे अपात्र ठरल्यानंतर केनियाच्या फेथ किपयेगोनला रौप्यपदक देण्यात आले. हसनने १४:३०.६१ वेळेत कांस्यपदक मिळवले युरोपियन विजेती इटलीची नादिया बट्टोक्लेटी हिचे कांस्यपदक थोडक्यात हुकले. ती नंतर चौथ्या क्रमांकावर फेकली गेली. तिने १४:३१.६४ अळी वेळ नोंदविली. ◂(वृत्तसंस्था)